# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २०९-२३ दिनांक :- ०७/०७/२०२३

## बॅंकेत पैसे भरण्यास मदत करा असा बहाणा करुन फसवणुक करणा-या सराईत आरोपीतांस ताब्यात घेण्यात गुन्हे शाखा कक्ष -३, विरार यांना यश.

-------00000-------

विरार पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात राहणारे फिर्यादी नामे श्री. दिपक श्रीकिशन कुशवाह, रा. बापा सिताराम चाळ, अनुसया हॉस्पीटल जवळ, विरार पुर्व हे दिनांक २२/०६/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता पंजाब नॅशनल बॅंक, विरार (प) ता. वसई जि. पालघर येथे गेले असता अरोपीत यांनी फिर्यादीस बॅंकेमध्ये पैसे भरुन देण्यास मदत करा असे सांगुन फिर्यादी यांचे ताब्यातील एकुण ७६,०००/-रोख रक्कम फिर्यादीस बोलण्यात अडकवुन लबाडीच्या इरादाने फसवणुक केली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दोन अनोळखी अरोपीतांविरुध्द विरार पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नंबर ६२१/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४२०, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात गेल्या काही महिन्यांपासुन फसवणुकीचे गुन्हयांत वाढ झाल्याने सदर घटनांची वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन पायबंद करणेबाबत सुचना दिल्या होत्या.

सदर गुन्हयाच्या अनुषंगाने वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष ३, विरार चे पोलीस अधिकारी व अंमलदार यानी तांत्रीक विश्लेषण व गुप्त बातमीदारकरवी प्राप्त माहितीच्या आधारे आरोपीत नामे १) मुस्ताक मुबारक शेख, रा. शिरगाव, जि. पालघर, २) विशाल रमेश राजभर, रा. पेंडकर पाडा, मिरारोड पुर्व, जि. ठाणे. ३) सुरज ऊर्फ प्रदिप पारसनाथ दुबे, रा. पेंडकर पाडा, मिरारोड पुर्व, जि. ठाणे. यांना दिनांक २९/०६/२०२३ रोजी गुन्हयात फसवणुक झालेल्या मुद्देमाला पैकी २१,०००/- रुपये किंमतीच्या मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेकडे प्राथमिक तपास करता त्याने खालील गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न होत आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर व कलम |
|---|---|---|
| १ | विरार पोलीस ठाणे | ६२१/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४२०,३४ प्रमाणे |
| २ | वालीव पोलीस ठाणे | ५६१/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४२०,४०६,३४ प्रमाणे |
| ३ | वर्सोवा पोलीस ठाणे | ३४३/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४२०,४०६,३४ प्रमाणे |
| ४ | बोरीवली पोलीस ठाणे | ९०/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४२०,३४ प्रमाणे |
| ५ | बोरीवली रेल्वे पोलीस ठाणे | ४१५/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४२०,३४ प्रमाणे |

नमुद आरोपीत यांचा पुर्व इतिहास पडताळुन पाहता उक्त आरोपीतांविरुध्द अशाच प्रकारे मुंबई, मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय व पालघर येथे १० पेक्षा जास्त गुन्हे नोंद असुन नमुद आरोपीत हे सद्या वर्सोवा पोलीस ठाणे (मुंबई पोलीस आयुक्तालय) यांचे कोठडी मध्ये आहेत.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष ३, विरारचे पो.नि. प्रमोद बडाख, पो.उप.निरी. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारावकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अंम. राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, म.सु.ब. सागर सोनवणे, गणेश यादव, प्रविण वानखेडे तसेच स.फौ. संतोष चव्हाण, नेम सायबर गुन्हे शाखा यांनी केली आहे.

----oooo----